**नि. दि. दा. क. २४/२०१३**
**तानबा वि. शोभा**
**<u>निशाणी क. ५७ पुढे</u>**

**(नि.क. १७३ वरील आदेशानुसार साक्षीदाराचा उलटतपास घेणेकामी प्रतिवादी क. ९ यांच्यातर्फे त्यांना रिकॉल करण्याबाबत विनंती न्यायालयातर्फे मान्य करण्यात आलेली आहे. )**

**<u>उलटतपास शपथेवर सुरू</u>**
**<u>प्रतिवादी क. ९ तर्फे सुविद्य विधीज्ञ श्री.वाय.ए.बागडे यांच्यामार्फत</u>**

तानबा माझा भाउ होता तो मयत झाला आहे. माझे शिक्षण दहावी पर्यंत झालेले आहे. मला इंग्रजी लिहीता वाचता येत नाही. मला इंग्रजी पुर्णपणे समजत नाही. हे म्हणणे खरे आहे की दावा दाखल करतेवेळी मधुकर लक्ष्मण डोंगरे यांना प्रतिवादी केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, या दाव्यापुर्वी २००९ साली सर्वे नं. २१०/६, नवा सर्वे नंबर २९२ बाबत दावा दाखल केला होता. त्या दाव्याचा क्रमांक २७/२००९ होता किंवा नाही ते माहित नाही. मला न्यायनिर्णयाची प्रत दाखविल्यावरून मी सांगतो की नियमित दिवाणी दावा क्र. २७/२००९ हा मी, तानबा, दुर्गा, छाया व रेखा यांनी मधुकर लक्ष्मण डोंगरे यांच्या विरूध्द दाखल केला होता व त्याचा निकाल लागलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की त्या दाव्याचा उल्लेख या दाव्यात केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, तो दावा दि. २०.०७.२०१२ रोजी खारीज करण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की या बाबीचा उल्लेख प्रस्तुतच्या दाव्यामध्ये केला नाही. जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर येथे प्रकरण क्र. ९०२/२०१२ प्रलंबित असल्यामुळे या दाव्यामध्ये पुर्वीच्या दाव्याचा उल्लेख केलेला नाही. २१०/६ आमचा नाही त्यामुळे या दाव्यामध्ये त्या क्रमांकाचा उल्लेख केलेला नाही. मी सांगतो की आमचा जुना सर्वे नं. २१०/९ आहे. हे म्हणणे खरे नाही की जुना सर्वे नं. २१०/६ याला नवीन सर्वे नं. २९२ असा

पडल्याबाबत या दाव्यात नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की नियमित दिवाणी दावा क्र. २७/२००९ मध्ये सर्वे नं. २१०/६ याचा नवीन सर्वे नं. २९२ आहे तो आमच्या मालकीचा असल्याबाबत कथन केले होते. मी आनंदराव फकीरा मोहतकर, विठ्ठल आनंदराव मोहतकर, सोनबा आनंदराव मोहतकर यांना ओळखत नाही. ते जुना सर्वे क्र. २१०/६ चे मुळ मालक होते किंवा नाही हे माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, जुना सर्वे क्र. २१०/६ हा लक्ष्मण नागो डोंगरे यांनी त्यांच्याकडुन रजिस्टर्ड खरेदी खताद्वारे खरेदी केला होता. हे म्हणणे खरे नाही की त्या खरेदीपासुन लक्ष्मण हे त्या जमीनीची उस्तवारी व वहीती करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, लक्ष्मण यांच्या नंतर त्यांची दोन मुले मधुकर आणि देवराव हे त्या जमीनीची उस्तवारी करीत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, जुना सर्वे नं. २१०/६ यालाच नवीन सर्वे नं. २९२ असा पडला आहे. हे म्हणणे खरे नाही की त्या जमीनीचे मुळे क्षेत्रफळ  १.३१ हे. आर होते व ते चुकीने १.२४ हे.आर.झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या नावावर सर्वे नं. २९२ चा उतारा चुकीने लागला आहे असा अर्ज प्रतिवादी क्र. ९ यांनी एस डी ओ यांचेकडे दिला होता. हे म्हणणे खरे नाही की तो अर्ज अदयाप प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २००९ मध्ये मी जमीनीची मोजणी करण्यासाठी तालुका निरिक्षक भुमी अभिलेख यांच्याकडे अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी सर्व अधिकारी हे मौक्यावर आले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी म्हणजेच दि. २१.०५.२००९ रोजी त्याबाबत पंचनामा तयार करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की आमचा त्या शेतीशी काहीही संबंध नाही असे त्यावेळी तालुका निरीक्षक भुमी अभिलेख कर्मचा-याच्या लक्षात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या पंचनाम्याच्यावेळी लालजी गुलाबराव बागडे, देविदास गुलाबराव बागडे, मधुकर लक्ष्मण डोंगरे, शंकरराव कारूलकर व

माझा भाउ तानबा देवराव कुहीटे हे हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी तेथे पटवारीसुध्दा हजर होते. हे म्हणणे खरे नाही की पटवारी यांनी त्यावेळी, 'जुना सर्वे नंबर २१०/६ व नवा सर्वे नं. २९२ हा एकच आहे, तो मधुकर लक्ष्मण डोंगरे यांच्या ताब्यात आहे' असे प्रमाणपत्र दिले होते.

वाद शेती आमची वडीलोपार्जीत असल्याबाबत मी पुरावा दाखल केला आहे. जुना सर्वे न. २१०/६ विकत घेतल्याबाबत विक्रीपत्र दाखल केलेले नाही. सर्वे नं. २९२ ही जमीन चंद्रभागाबाई वाकोडे यांच्याकडुन दि. ११.१२. १९९८ रोजी घेतल्याबाबत दस्त दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की दि. २१.०५.२००९ रोजी पटवारी यांनी दिलेला अहवाल आम्हाला मान्य नसल्यामुळे दि. ०१.०६.२००९ रोजी आम्ही त्याबाबत दावा दाखल केला होता. दिवाणी दावा दि. ०१.०६.२००९ पुर्वी दाखल न करण्याचे कारण म्हणजे आम्ही २००२ साली मोजणी केली, त्यामध्ये मधुकर डोंगरे यांनी सर्वे नं. २९२ वर अतिक्रमण केले असे दिसुन आले होते. त्यानंतर आम्ही मधुकर डोंगरे यांना नोटिस पाठविली होती. त्यानंतर आम्ही २००२ नंतर त्याबाबत केस टाकली होती. २००२ सालापासुन दि. ०१.०६.२००९ पर्यंत दावा दाखल न करण्याचे कारण काहीही नाही. हे म्हणणे खरे आहे की सर्वे नं २१०/६ चा उल्लेख दाव्यात अथवा पुराव्याच्या शपथपत्रामध्ये नाही. २००९ साली दाखल केलेल्या दाव्याचा निकाल लागल्यानंतर त्यातील न्यायनिर्णयाची प्रत मी वाचलेली नाही. मी सांगतो की माझे वकील श्री मुळे यांनी ती वाचलेली आहे. त्यांनी मला त्या न्यायनिर्णयामध्ये न्यायालयाने, 'आम्ही जुना सर्वे नं. २१०/६ नवा सर्वे नं २९२ चे मालक नाही' असे निरीक्षण नोंदविल्याबाबत सांगितले नव्हते. न्यायालयाने त्या न्यायनिर्णयामध्ये १९६५ पासुन मधुकर डोंगरे यांच्या ताब्यामध्ये ती जमीन आहे असे निरीक्षण नोंदविल्याबाबत माझ्या वकीलांनी मला सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की तो दावा खारीज करण्यात

आला होता. तो दावा त्या वाद मिळकतीचे मालक मधुकर डोंगरे असल्यामुळे खारीज करण्यात आला होता किंवा नाही हे माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, जिल्हा व सत्र न्यायालयाने दिवाणी न्यायालयाचा न्यायनिर्णय सेट अ साईड अथवा रद्द केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, या न्यायालयापासुन पुर्वीच्या दावा व न्यायनिर्णयाबाबत तथ्ये लपवुन ठेवण्यासाठी त्याबाबत उल्लेख या दाव्यामध्ये केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, जुना सर्वे क्र. २१०/६ नवीन सर्वे क्र. २९२ या मिळकतीचे मालक नसल्यामुळे त्याबाबत घोषणा व मनाई हुकुम मागण्याचा आम्हाला अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सध्या सदर मिळकत लक्ष्मण डोंगरे वहीती करतात व ती त्यांच्या ताब्यामध्ये आहे. नवीन सर्वे क्र. २९२ आमच्या मालकीचा आहे व तो आम्ही वहीती करतो हे दर्शविणारा दस्त न्यायालयात दाखल केलेला आहे. मी सांगतो की, तो दस्त म्हणजे ७/१२ उतारा दाखल केला आहे. मी नि.क्र. ५७ वाचलेले आहे. मी त्यामध्ये सगळे डाकुमेंट्स व मी मालक आहे असे त्यात लिहीलेले आहे. मी सांगतो की त्यामध्ये जे लिहीलेले आहे तेच त्यामध्ये आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सर्वे नं. २९२ चा मालक नसताना प्रतिवादी यांना त्रास देण्याच्या उद्देशाने त्यांच्याविरूध्द खोटा दावा दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी यांच्याविरूध्द खोटे शपथपत्र दाखल करून खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, यापुर्वी कधीही मी त्या शेताचा मालक नव्हतो व आजही त्या शेताचा मालक नाही.

**उलटतपास पूर्ण.**

समक्ष/श्रवणोत्तर स्विकृत

कळमेश्वर
दिनांक : १७.०४.२०२३.

**( यो. सु. कवडे)**
प्रभारी सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कळमेश्वर